नियमीत दिवाणी दावा ५७०/२०२१ - निशाणी ५ खालील आदेश

प्रकाश बबन तेली (वसमळे) विरुद्ध बापू हरिपा तेली (वसमळे)

CNR NO. MHSO20-002619-2021

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे कलम ३९ नियम १ व २ अन्वये तूर्तातूर्त मनाईच्या आदेशासाठी केला आहे.

२. दावा मिळकत खालीलप्रमाणे-

डि. सोलापूर सब डि. व ता. सांगोला पैकी मौजे यलमार मंगेवाडी येथील ग्रामपंचायत हद्दीतील जमिन -

अ.नं.	गट नं.	क्षेत्र हे-आर
अ	५११/२	०-६९ पैकी ०-२७
ब	५११/१	०-८७

येणेप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत आतील झाड, झुडूप, दगड, माती, बांध, बांधोरे वगैरे तदंगभुत वस्तु व हक्कासह.

३. अर्जातील वादीचे थोडक्यात कथन की, दावा मिळकत कलम १ ही वादीची मालकी हक्क मिळकत आहे. सदरची मिळकत त्याने मूळ मालक रामचंद्र बहिरप्पा तेली यांचे कडून खरेदी घेतली आहे. त्यातील दावा कलम ब ही मिळकत रामचंद्र बहिराप्पा तेली याने प्रतिवादी ला विक्री केली आहे. त्यामुळे दावा मिळकतीचे ५११/१ व ५११/२ असे गट पडले आहेत. रामचंद्र बहिरप्पा तेलीने प्रतिवादीस दावा मिळकत १ब चे खरेदीखत करताना गट नंबर ५११/२ च्या दक्षिण बाजूने ७ फुटाचा रस्ता राखून ठेवला. तेव्हापासून सदर रस्त्याचा वापर वादी सहहिस्सेदार मयत रामचंद्र बहिरप्पा तेली करत होते. सदर रस्ता जवळा-भोपसेवाडी रस्त्यापासून सुरू होतो.

४. वादीचे पुढील कथन की, दिनांक १६/११/२०२१ रोजी वर नमूद रस्त्याने पेरणीसाठी ट्रॅक्टर घेऊन वादी चालला असताना प्रतिवादीने त्याला, ह्या रस्त्याने तुला

जाऊ देणार नाही. मी गट नंबर ५११/ २ साठी रस्ता ठेवला असला तरी रामचंद्र बहिरप्पा तेली हे सध्या मयत आहेत. त्यामुळे तुला रस्त्याने जाऊ देत नाही, तुला काय करायचे ते कर असे म्हणाला. वादीने याबाबत मयत रामचंद्र तेली यांच्या वारसांना सांगितले असता वारसांनी प्रतिवादीस समजून सांगण्याचा प्रयत्न केला असता, तो त्यास दात देत नाही. प्रतिवादीस मयत रामचंद्र तेली यांची जमीन खरेदी करण्याची असल्याने तो अलीकडे अडमुठेपणे वागू लागला आहे. त्याला गावातील प्रतिष्ठित इस्मानमार्फत समजावून सांगण्याचा प्रयत्न केले असता त्याने दाद दिली नाही.

५. वादीचे पुढील कथन की, प्रतिवादी वयस्कर असला तरी अडदांड असून तो कोणाचेही ऐकत नाही. दावा मिळकत ५११/२ मध्ये वादीचे राहते घर असून तेथे वादीने बागायती क्षेत्र केले आहे. त्यामुळे वाहन नेणे-आणणे व बाजार व्यवहारासाठी जवळा गावात यावे-जावे लागते. प्रतिवादीच्या आडमुठेपणामुळे वादीची व त्याच्या कुटुंबीयांचे दारकोंडी होऊन दैनंदिन व्यवहार करणे अशक्य झाले आहे. त्यामुळे प्रतिवादीने स/ग/ल २६३९/२००७ च्या खरेदी खताने गट नंबर ५११/२ कडे जाण्यासाठी राखून ठेवलेला गट नंबर ५११/१ च्या दक्षिण बाजूने दावा मिळकत गट नंबर ५११/१ मधून भोपसेवाडी-जवळा रस्त्याला मिळणाऱ्या रस्त्याचे वहिवाटीस हरकत अडथळा होईल असे कृत्य करू नये म्हणून प्रतिवादी देण्याची विनंती केली आहे.

६. प्रतिवादीने निशाणी २० वर त्याचे म्हणणे व कैफियत दिली आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, वादीने खोटा व लबाडीचा दावा दाखल केला आहे. तो त्याला मान्य व कबूल नाही. प्रतिवादीने गट नंबर ५११/१ मिळकत खरेदी खताने वादीने दिली आहे. त्यावेळी प्रतिवादी यांनी जमीन गट नंबर ५११/१ चे दक्षिण बाजूस वादी यांचे जाणे-येण्यासाठी ७ फूट रुंदीचा रस्ता ठेवला होता. वादीने प्रतिवादींना त्रास देण्याच्या हेतूने मे. तहसीलदार सांगोला यांचे कोर्टात रस्ता/ एस आर नंबर ७/२०१६ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ प्रमाणे गटाचे हद्दीवरून रस्ता मिळण्यासाठी दाखल केला दिनांक २८/१२/२०१८ रोजी सदरचा अर्ज नामंजूर झाला. दरम्यानच्या काळात गट नंबर ५११/१ चे दक्षिण बाजूस सोडलेल्या ७ फुटाच्या रस्त्यावर उत्तर बाजूने असलेल्या

जमीन मिळकत गट नंबर ५१०/२ च्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण केले. याबाबत प्रतिवादीने वादीस कल्पना दिली होती. गट नंबर ५१०/१ च्या शेतकऱ्यांनी रस्त्यावर दक्षिण बाजूने बांध बांधल्यामुळे जमीन गट नंबर ५११/१ च्या दक्षिण बाजूने जाणे-येण्यासाठी २ फुटाचा रस्ता राहिला आहे.

७. गट नंबर ५११/१ मध्ये प्रतिवादीचे स्वतःचे पत्र्याचे घर आहे. त्याच्या शेजारी मोठी लिंबाची झाडे आहेत. प्रतिवादीने सदरचे घर बांधते वेळी दक्षिण बाजू ७ फुटाचा पूर्व-पश्चिम चालीचा रस्ता सोडला होता. गट नंबर ५१०/२ मधील शेतकऱ्यांनी अतिक्रमण करून बांध घातला. त्यावर लहान लहान झाडे व गवत उगवले आहे. वादीने प्रतिवादीने सोडलेल्या रस्त्याचा वेळेत वापर न केल्यामुळे त्यावर लगतच्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण केले आहे. वादीचा नवीन रस्ता मागणीचा अर्ज ना मंजूर झाला आहे. वादीने सदर निकालावर केलेले अपील अद्याप उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा यांच्याकडे प्रलंबित आहे. प्रस्तुत दावा दाखल करण्यास वादीस कोणतेही कारण घडले नाही. दाव्याचा समतोल प्रतिवादीच्या बाजूने आहे. वादीचा अर्ज मंजूर झाल्यास आदेशाचा फायदा घेऊन २ फुटाचा अस्तित्वात असलेला रस्ता ७ फुटापर्यंत बेकायदेशीरपणे प्रतिवादीच्या मिळकतीत वाढवण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रतिवादीचे कधीही न भरून येणारे फार मोठे नुकसान होणार आहे. २ फुटाचे असलेल्या रस्त्यावरून ये-जा करत आहे. त्यामुळे वादीस कोणतीही अडचण येत नाही व वादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. त्यामुळे वादीने दाव्यात मिळकतीच्या चतुःसीमा दिलेल्या नाहीत नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

८. वादीच्या प्रतिवादीच्या कथनावरुन व दाखल कागदपत्रांवरुन माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१.	प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजूने आहे काय ?	होय

२.	न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ?	होय
३.	सदरचा अर्ज नामंजूर केल्याने वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे का ?	होय
४.	आदेश काय ?	अंतिम आदेशाप्रमाणे

कारणमिमांसा

९. अभिलेखावरील कागदपत्रांची पडताळणी केली असता असे दिसून येते की, वादीने त्यांच्या कथनापृष्ट्यर्थ खालील कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

अ.क्र.	तपशिल	निशाणी
१.	दावा मिळकत गट नं.५११/२, ५११/१ चा ७/१२ उतारा	४/१, ४/२
२.	सगल/२६३९/२००७ प्रमाणित प्रत	४/३
३.	दावा मिळकत छायाचित्र	१७/१
४.	आर.टी.एस. ३६/२०१९ प्रतिवादी म्हणणे प्रत	१७/२
५.	कुलमुखत्यार पत्राची मुळ प्रत	३०/१

१०. अभिलेखावरील कागदपत्रांची पडताळणी केली असता असे दिसून येते की, प्रतिवादींनी त्यांच्या कथनापृष्ट्यर्थ खालील कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

अ.क्र.	तपशिल	निशाणी
१.	फोटो	२०/१
२.	तहसिलदार, सांगोला यांचे कोर्टातील रस्ता केस नं.७/२०१६ ची निकालाची झेरॉक्सप्रत	२३/१
३.	रस्ता केस नं.७/२०१६ चे निकालावर उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा यांचेकडे केलेले अपिलचे झेरॉक्स प्रत	२३/२
४.	कुलमुखत्यार पत्राची मुळ प्रत	२६/१

<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत -</u>

११. सदर मुद्द्यांचे निष्कर्ष एकमेकांशी संबंधित असल्याने कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्र चर्चेसाठी घेतले आहेत.

१२. वादीचे विधीज्ञाने असा युक्तिवाद केला की, दावा मिळकतीचा वादी मालक आहे ही बाब प्रतिवादीस मान्य व कबूल आहे. प्रतिवादीला करून दिलेल्या खरेदी खताप्रमाणे प्रतिवादीच्या मिळकतीतून वादीच्या मिळकतीत जाण्याकरिता दक्षिण बाजूस ७ फूट रस्ता सोडण्याचे खरेदी खतात नमूद आहे. सदरचे खरेदीखत मूळ मालक रामचंद्र बहिराप्पा तेली व प्रतिवादी यांच्यात झाले आहे. खरेदीखताप्रमाणे प्रतिवादीने वादीस जाण्याकरिता रस्ता सोडला होता. मूळ मालक रामचंद्र बहिरप्पा तेली मयत झाल्यापासून प्रतिवादीने वादीला सोडलेल्या रस्त्यावर हरकत अडथळा करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे वादीस त्याच्या मिळकतीत जाऊन मशागत व शेतीची कामे करणे अशक्य झाले आहे. दावा मिळकतीत वादीचे राहते घर असून त्याच्या कुटुंबाला देखील त्यामुळे त्रास होत आहे. खरेदीखताप्रमाणे ७ फूट रस्ता असल्याचे प्रतिवादीने मान्य केले आहे. परंतु सध्या तेथे २ फूट रस्ता असल्याचे प्रतिवादी सांगत आहे. परंतु खरेदी खताप्रमाणे ७ फुटाचा रस्ता वापरण्याचा वादीचा हक्क व अधिकार आहे. सदर हक्काचे प्रतिवादीच्या कृत्यामुळे इजा पोहोचत आहे. त्यामुळे प्रतिवादीच्या विरुद्ध मागणी केल्याप्रमाणे देण्याची विनंती केली आहे.

१३. याउलट प्रतिवादीच्या विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, सद्यस्थितीत सदर जागेवर २ फुटाचा रस्ता राहिला आहे. वादीने सदर रस्त्याचा वेळेत वापर न केल्याने लगतच्या शेतकऱ्यांनी त्या क्षेत्रात अतिक्रमण करून बांध घातले आहेत. वादीने मे. तहसीलदार, सांगोला यांच्याकडे दाखल केलेल्या अर्जाबाबत तसेच मे. उपविभागीय कार्यालय, मंगळवेढा त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या अपिलाबाबत दाव्यात कथन केले नाही. सदरची बाब त्यांनी लपवून ठेवली आहे. वादी स्वच्छ हाताने मेहरबान कोर्टात आलेला नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. तसेच वादीचा अर्ज मंजूर केल्यास सदर आदेशाच्या जोरावर वादी सध्या अस्तित्वात असलेल्या २ फूट रस्त्याच्या

अलीकडे सरकून ७ फुटाचा रस्ता वापरण्याचा प्रयत्न करेल. त्यामुळे प्रतिवादीचे क्षेत्रात अतिक्रमण होऊन त्याचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. अर्जाचा समतोल प्रतिवादीच्या बाजूने आहे. वादी सध्या अस्तित्वात असलेला २ फुटाचा रस्ता वापरत आहे. तो त्याला पुरेसा आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

१४. वादीचा अर्ज, प्रतिवादीचे म्हणणे व अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी व दावा मिळकतीचा मूळ मालक मयत रामचंद्र बहिरप्पा तेली यांच्यामध्ये झालेल्या खरेदी खताप्रमाणे प्रतिवादीने वादीच्या दावा मिळकतीत जाण्याकरिता ७ फुटाचा रस्ता सोडला होता. परंतु मूळ मालक रामचंद्र बहिरप्पा तेली याच्या मृत्यूनंतर प्रतिवादीने सदरचा रस्ता वादी वापरण्यास हरकत अडथळा करत आहे. त्यामुळे प्रतिवादी विरुद्ध दाव्याचा अंतिम निकाल होईल हुई पावतो खरेदी खतात नमूद केल्याप्रमाणे रस्त्यावर जाण्यास वादीस हरकत करू नये अशी ताकीद देण्याची मागणी केली आहे.

१५. वादीचा अर्ज व मागणी पृष्ठ्यर्थ त्याने अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता निशाणी ८ वर वादीने गट नंबर ५११/२ चा गाव नमुना ७ दाखल केला आहे. त्यावरून वादी प्रकाश तेली २७ आर व रामचंद्र बहिरप्पा तेली ४२ आर क्षेत्राचे भोगवटदार असल्याचे दिसून येत आहे. निशाणी ९ वर प्रतिवादी बापू तेली याचे गट नंबर ५११/१ चा गाव नमुना ७ दाखल केला आहे. त्यावरून संपूर्ण क्षेत्र त्याच्या ताब्यात असल्याचे दिसत आहे. निशाणी ४/३ वर खरेदीखत क्रमांक २६३९/१ / १२/२०७ ची साक्षांकित प्रत दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता सदरचे खरेदीखत प्रतिवादी क्रमांक १ व रामचंद्र तेली यांच्यामध्ये दिनांक २३/०७/२०१७ रोजी झाले आहे. सदरचे खरेदीखत गट नंबर ५११/१ बाबत असून त्यातील पान क्रमांक ४ वर "सदर गटाचे दक्षिण बाजूने ७ फुटाचा रस्ता गट नंबर ५११/२ या गटात जाणे येण्यासाठी राखून ठेवला आहे. त्या रस्त्याच्या हक्कास हक्कसह" असे नमूद केले आहे. खरेदी खतातील मिळकतीच्या चतु:सीमा पाहिल्यास त्या पूर्व बाजूस गट नंबर ५११/२ व दक्षिण

बाजूस गट नंबर ५१०/२ असल्याचे दिसून येत आहे. वादीने निशाणी १७ सोबत दावा मिळकतीचा फोटोग्राफ दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यावर दगडांनी बांध घातल्याचे दिसत आहे. निशाणी २० सोबत वादी दावा मिळकतीत ट्रॅक्टरच्या सहाय्याने रस्ता निर्माण करत असल्याचे दाखवणारे ३ फोटोग्राफ दाखल केले आहेत.

१६. निशाणी ४/३ वर दाखल केलेल्या खरेदीखतावरून गट नंबर ५११ च्या दक्षिण बाजूस ७ फूट रस्ता दावा मिळकतीत जाण्या-येण्याकरिता वापरण्याचा वादीचा हक्क व अधिकार असल्याचे दिसून येत आहे. निशाणी ८ वरील गाव नमुना ७ वरून वादी दावा मिळकतीच्या कब्जे वहिवाटीस असल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे वादीने सदर रस्त्याचा वेळेत वापर न केल्याने गट नंबर ५१०/२ मधील शेतकऱ्याने अतिक्रमण करून त्यावर बांध घातला आहे. त्या बांधावर गवत आले आहे. सद्यस्थितीत त्या जागेवर २ फुटाचा रस्ता अस्तित्वात आहे. तो वादीस पुरेसा आहे. यावरून ही बाब सिद्ध होते की, दावा मिळकतीत जाण्याकरिता प्रतिवादीचे गट नंबर ५११/१ मधील दक्षिण बाजूने ७ फुटाचा रस्ता प्रतिवादी व मूळ मालक रामचंद्र बहिराप्पा तेली यांच्यामध्ये झालेल्या खरेदीखताप्रमाणे सोडला होता. वादीने सदर दावा मिळकतीत त्याचे बागायत क्षेत्र असून राहते घर असल्याचे कथन केले आहे. ते प्रतिवादीने नाकारले नाही. यावरून दावा मिळकतीत वादीचे राहते घर व बागायत क्षेत्र असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शेतीची मशागत व इतर संबंधित कामे करण्याकरिता ट्रॅक्टर अगर मोठी वाहने जाण्या-येण्याकरिता रस्ता असणे आवश्यक आहे. प्रतिवादीने कथन केल्याप्रमाणे गट नंबर ५१०/२ मधील शेतकऱ्यांनी अतिक्रमण केल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दिला नाही. त्यामुळे सद्यस्थितीत दावा मिळकतीचे गाव नमुना ७ व निशाणी ४/३ वर दाखल केलेल्या खरेदीखतावरून गट नंबर ५११/२ च्या दक्षिण बाजूने ७ फूट रस्ता वापरण्याचा वादीस हक्क व अधिकार असल्याचे प्रथमदर्शने दिसून येत आहे. सदरचे खरेदी खत अद्याप रद्दबातल झाले नाही. अगर त्यातील सदरची अट रद्द झाली नाही.

१७. प्रतिवादीने मा. सर्वोच्च न्यायालयाचा Civil Appeal No.(S) 9336 of 2019 चा न्यायनिर्णय दाखल केला आहे. त्यातील परिच्छेद क्र.४७ चा प्रतिवादी यांनी

आधार घेतला आहे.

> Para No.47 :- “Under Order 39 of the Code of Civil Procedure, jurisdiction of the Court of interfere with an order of interlocutory or temporary injunction is purely eqquitable and, therefore, the Court on being approached, will, apart from other considerations, also look to the conduct of the party invoking the jurisdiction of the Court, and ma refuse to interfere unless his conduct was free from blame. Since the relief is wholly equitable in nature, the party invoking the jurisdiction of the Court has to show that he himself was not at fault and that he himself was not responsible for bringing about the state of things complained of and that he was not unfair or inequitable in his dealings with the party against whom he was seeking relief. His conduct should be fair and honest....”

परंतु, प्रस्तुत प्रकरणात वादीच्या चुकीमुळे त्याच्या रस्त्याचा वापर करता येणार नाही ही बाब प्रतिवादीने प्रथमदर्शनी दाखवून दिली नाही. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा मान राखून सदरचा न्यायनिर्णय प्रतिवादीच्या बाजूने नाही.

१८. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे वादीचा दावा मंजूर झाल्यास वादी त्याच्या क्षेत्रात अतिक्रमण करून ७ फूट रस्ता वापरण्याचा प्रयत्न करेल. परंतु वादीच्याच म्हणण्याप्रमाणे ७ फुटाचा रस्ता यापूर्वी देखील अस्तित्वात होता. त्यामुळे प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे वादी अर्जाच्या आदेशाचा गैरफायदा घेऊन प्रतिवादीच्या मिळकतीत अतिक्रमण करेल ही बाब योग्य वाटत नाही. वादीने अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांवरून गट नंबर ५११/२ च्या दक्षिण बाजूला सोडलेल्या ७ फूट रस्त्याचा वापर करण्याचा त्याला हक्क व अधिकार आहे. प्रतिवादीचे म्हणण्याचे अवलोकन केले असता सदरच्या रस्त्यावर वादीच्या जाण्यावर हरकत अडथळा होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

१९. वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे गट नंबर ५११/२ च्या दक्षिण बाजूला असलेल्या ७ फूट रस्ता वापरण्याचा त्याचा हक्क व अधिकार असल्याचे प्रथमदर्शनी दाखवून दिले आहे. दावा मिळकतीत वादीचे राहते घर व बागायत क्षेत्र आहे. त्यामुळे वादीस सदर रस्त्याने ये-जा करण्याची गरज आहे. वादीचा अर्ज नामंजूर केल्यास वादीच्या कायदेशीर हक्कास बाधा येऊन त्याचे मिळकतीतील असलेली पिकांचे मेहनत मशागत करणेस अडथळा निर्माण होणार आहे व त्याचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. याउलट वादीचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे वादीच्या तुलनेत काय नुकसान होणार आहे ही बाब प्रतिवादीने दाखवून दिली नाही. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे सदरचा रस्ता पूर्वी अस्तित्वात होता. त्यामुळे तोच रस्ता वादीस वापरण्यास प्रतिवादीने हरकत अडथळा करू नये असा आदेश दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. अर्जाचा समतोल वादीच्या बाजूने दिसून येत आहे. त्यामुळे मुद्दा क्रमांक २ व ३ करिता होकारार्थी उत्तर नोंदवत आहे. मुद्दा क्रमांक ४ करिता खालील आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. वादीचा (निशाणी ५) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने सगल/२६३९/२००७ च्या खरेदीखताने गट नंबर ५११/२ कडे जाण्यासाठी राखून ठेवलेला गट नंबर ५११/१ च्या दक्षिण बाजूने दावा मिळकत गट नंबर ५११/२ मधून भोपसेवाडी-जवळा रस्त्याला मिळणाऱ्या ७ फूट रस्त्याचे वहिवाटीस स्वतः अगर इतरांमार्फत दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत हरकत अडथळा होईल असे कृत्य करू नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात येत आहे.

खुल्या न्यायालयात जाहीर.

BHAGYASHRI MADHUKAR POTDAR
Digitally signed by BHAGYASHRI MADHUKAR POTDAR
Date: 2023.07.28 14:01:55 +0530

सांगोला
दि.२१/०७/२०२३

(सौ. बी. एम. पोतदार)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
सांगोला

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

(a)	Name of Stenographer	:	Shri. S. S. Patne
(b)	Court	:	Mrs. B. M. Potdar, Jt. Civil Judge, J.D.& J.M.F.C.Sangola
(c)	Judgment /Order signed by P.O. on	:	28.07.2023
(d)	Judgment /Order uploaded on	:	28.07.2023